गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ● अंक ३१८ वा ● सोमवार ०८ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 318 | Date : 08/04/2024 blow Monday Page 4 Price 4

## राहुल गांधी यांनी राजकारणातून माघार घेण्याचा विचार करावा

### राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांचा सल्ला



नवी दिल्लीः आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला अपेक्षित असलेला निकाल न मिळाल्यास राहुल गांधी यांनी राजकारणातून माघार घेण्याचा विचार करावा, असा सल्ला राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी दिला आहे. पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्त्वाबद्दलही चिंता व्यक्त केली. गेल्या १० वर्षांत काँग्रेस पक्षाची वाताहात झालेली असतानाही राहुल गांधींनी पक्षाची सूत्रे दुसऱ्याच्या हाती दिली नाहीत. हे लोकशाहीविरोधी आहे, असं प्रशांत किशोर म्हणाले.

आपल्या मर्यादा ओळखून त्या अधोरेखित करणे आणि आपल्यातील कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न करणे हे एखाद्या नेत्याचं लक्षण आहे. चांगले नेते त्यांच्यातील कमतरता मान्य करतात आणि त्या कमतरता भरुन काढण्याचा प्रयत्न करतात. परंतु, राहुल गांधी आपल्याला सर्वकाही माहीत आहे, अशा अविर्भावात असतात, असं वाटतं. त्यांच्या संकल्पना प्रभावीपणे अंमलात आणण्याकरता त्यांना इतरांची मदत घ्यावी, असं वाटत नाही, असं प्रशांत किशोर म्हणाले.

राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी यांनी १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव यांना १९९१ मध्ये नेतृत्त्व करण्याची परवानगी दिली होती. हा संदर्भ देत राहुल गांधींनीही अशाच पद्धतीचा विचार करण्याची विनंती केली आहे. पक्षाच्या भल्यासाठी गांधींनी त्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवण्याची गरज आहे, असा सल्ला किशोर प्रशांत यांनी दिला.

काँग्रेस पक्षातील अनेक नेत्यांना निर्णय प्रक्रियेत अडथळे येतात. कारण त्यांना अगदी किरकोळ बाबींसाठीही राहुल गांधींकडून परवानगी घ्यावी लागते, असंही ते म्हणाले. निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि प्रसारमाध्यमं यांसारख्या यंत्रणांमुळे पक्षाला अडचण निर्माण झाली आहे, असं राहुल गांधी म्हणतात. मात्र, त्यांच्या या दाव्यात काहीच तथ्य नसल्याचंही प्रशांत किशोर म्हणाले. तर, काँग्रेसमधील अंतर्गत संरचनात्मक समस्याही काँग्रेसच्या घसरत्या कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावतात, असं प्रशांत किशोर म्हणाले. तसंच, किशोर यांनी काँग्रेसचे अधःपतन होत असल्याचाही दावा फेटाळून लावला. पक्षाच्या अंतर्गत त्रुटी दूर करून निवडणुकीतील प्रासंगिकता पुन्हा मिळवण्यासाठी पक्षाच्या कार्यपद्धतीची पुनर्रचना करण्याच्या गरजेवर भर दिला.

## खरगेंची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीची!

### अनुच्छेद ३७०वरून पंतप्रधान मोदींची टीका



नवादा (बिहार) : अनुच्छेद ३७०च्या मुद्दयावरून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या वक्तव्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेस अध्यक्षांची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीसारखी आहे, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी रविवारी केला. तर काँग्रेसने राजकीय पक्ष म्हणून राहण्याचा नैतिक अधिकार गमावला असल्याचा दावा भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केला.

राजस्थानमधील जयपूर येथे शनिवारी झालेल्या सभेत खरगे यांनी ''जम्मू आणि काश्मीर व राजस्थानचा काय संबंध? राजस्थानात झालेल्या सभेत पंतप्रधान मोदी अनुच्छेद ३७०बद्दल का बोलत आहेत, ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर का बोलत नाहीत?'' अशी टीका केली होती. त्याला खरगे यांचे नाव न घेता मोदी यांनी उत्तर दिले.'व्यस्थेवर कसा परिणाम होईल?

बिहारमधील नवादा येथील प्रचार सभेत बोलताना मोदी म्हणाले की, ''काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांचे पद ही काही लहान बाब नाही. त्यांना असे वाटते की अनुच्छेद ३७०चा राजस्थानशी काहीही संबंध नाही. जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग नाही का? त्यांची मानसिकता तुकडे-तुकडे टोळीसारखी आहे.'' मोदी पुढे म्हणाले की, ''इंडिया आघाडी राज्यघटनेविषयी बोलते. । पान २ वर

## 'बेरोजगारी हा निवडणुकीतील मोठा मुद्दा' : मल्लिकार्जुन खरगे



नवी दिल्ली : भाजपने लादलेली बेरोजगारी हा या लोकसभा निवडणुकीतील सर्वात मोठा मुद्दा आहे, असे मत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी रविवारी व्यक्त केले. तरुणांना नोकऱ्या शोधण्यात समस्या येत आहेत आणि देशासमोर लोकसांख्यिकीचे दुःस्वप्न उभे आहे, असा इशाराही त्यांनी दिला.'एक्स' या समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये खरगे यांनी विश्र्वास व्यक्त केला की, काँग्रेसच्या 'युवा न्याय'अंतर्गत 'पहिली नोकरी पक्की' हमीमुळे काम आणि शिक्षणादरम्यानचे अडथळे दूर होतील, त्यामुळे तरुणांच्या कारकीर्दीसाठी नवीन संधी निर्माण होतील. देशातील 'आयआयटी' आणि 'आयआयएम' या अग्रणी शैक्षणिक संस्थांचे उदाहरण देत खरगे यांनी लिहिले की, ''१२ 'आयआयटी'मधील जवळपास ३० टक्के विद्यार्थ्यांना नियमित नोकऱ्या मिळत नाहीत. देशातील २१ 'आयआयएम'पैकी केवळ २० टक्के विद्यार्थ्यांना उन्हाळयात नोकऱ्या मिळाल्या आहेत. 'आयआयटी' आणि 'आयआयएम'मध्ये ही परिस्थिती असेल तर भाजपने देशभरातील । पान २ वर

## मराठी नववर्ष आणि गुढीपाडवा दिवशी विठ्ठलाचे मुख दर्शन दिवसभर : औसेकर महाराज



पंढरपूर/प्रतिनिधी : मराठी नव वर्ष आणि साडे तीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त म्हणजेच गुढी पाडवा. या दिवशी श्री विठ्ठल आणि रुक्मिणीमातेचे मुख दर्शन दिवसभर घेता येणार आहे. सध्या विठ्ठल मंदिराचे संवर्धनाचे काम सुरु असल्याचे देवाचे पायावर डोके ठेवून दर्शन बंद आहे. मात्र भाविकांसाठी सकाळी मुख दर्शनाची सोय केली आहे. पाडव्याच्या दिवशी म्हणजे ९ एप्रिल रोजी पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत मुख दर्शन भाविकांना घेता येईल अशी माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे.

सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविक आतुरलेला असतो. मात्र सध्या श्री विठ्ठल मंदिराचे संवर्धनाचे काम सुरु आहे. त्यामुळे सध्या विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे मुख दर्शन म्हणजे लांबून दर्शन घेता येत आहे. हे दर्शन पहाटे ५ ते सकाळी ११ वाजेपर्यंत भाविकांना घेता येत आहे. मात्र दि ९ एप्रिल रोजी गुढी पाडवा आहे. या दिवशी राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात. ही बाब ध्यानात घेवून मंदिर समितीने देवाच्या मुख दर्शनाच्या वेळेत फक्त एक दिवस म्हणजेच पाडव्याची दिवशी वाढ केल्याची माहिती औसेकर महाराज यांनी दिली आहे. गुढी पाडवा या दिवशी श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचे मुख दर्शन पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत भाविकांना घेता येणार आहे अशी माहिती त्यांनी दिली.

तसेच वारकरी संप्रदायातील महत्वाची मानली जाणारी चैत्री वारी कालावधीत देखील देवाचे मुख दर्शन घेता येणार आहे. दि १५ ते २१ एप्रिल दरम्यान भाविकांना देवाचे मुख दर्शन पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत घेता येणार आहे. सध्या उन्हाचा कडाका वाढत आहे. त्यामुळे यात्रा कालावधीत भाविकांना दर्शन रांगेत स्पिंकरल, कुलर, थंड पिण्याचे पाणी, सरबत, मठ्ठा वाटप करण्यात । पान २ वर

## लोकसभा निवडणुकीसाठी दिव्यांग कर्मचारी करणार २५४ मतदान केंद्रांचे नियंत्रण

मुंबई : येत्या लोकसभा निवडणुकांसाठी प्रत्येक मतदारसंघात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्रे असणार आहेत. राज्यभरात एकूण २५४ मतदान केंद्राचे नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारसंघात दिव्यांगांसाठी मतदान केंद्रे असावीत यावर भर दिला असून 'दिव्यांग नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्यात येणार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे एकूण ३० मतदान केंद्रांचे नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. जळगावमध्ये २२, पुण्यामध्ये २१, ठाण्यामध्ये १८ आणि नाशिकमध्ये १५ दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत. अकोला, कोल्हापूर, लातूर, पालघर, परभणी, रायगड या ६ जिल्ह्यांत प्रत्येकी १ दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र असणार आहे. गडचिरोली, सिंधुदुर्ग आणि वाशिम या जिल्ह्यात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र नसेल.

या वर्षी मतदार यादीमध्ये एकूण ६,०४,१४५ इतके दिव्यांग मतदार चिन्हांकित आहेत. त्यापैकी ज्या। पान २ वर



## विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांच्या हस्ते सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघ संदर्भ पुस्तिकेचे प्रकाशन

### * संदर्भ पुस्तिकेमध्ये सन १९८० ते २०१९ पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील दोन्हीही लोकसभा मतदारसंघातील निकालाची देण्यात आली आहे *राजकीय जाहिरातीचे पूर्व प्रामाणिकरण, पेड न्यूज, आदर्श आचारसंहिता आदीची माहिती

सोलापूर/प्रतिनिधीः भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासन लोकसभा निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तयारीला लागलेले असून त्याच अनुषंगाने माध्यम कक्षामार्फत सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाची सन १९८० ते २०१९ पर्यंतची संदर्भ पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते नियोजन भवन येथील सभागृहात झाले.

यावेळी जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद, अप्पर जिल्हाधिकारी तथा माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मोनिका सिंग ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पोलीस शहर उप आयुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, जिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे निवडला अधकारी सुनील सोनटक्के यांच्यासह अन्य सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार व । पान २ वर

**संदर्भ पुस्तिका:- भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणुका कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी दिनांक ७ मे २०२४ रोजी मतदान होणारा असून दिनांक ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर माध्यम कक्षाच्या वतीने सन १९८० ते २०१९ पर्यंत ची उमेदवारांच्या मतांच्या आकडेवारी सह अन्य निवडणूक संबंधी माहिती देण्यात आलेली आहे ती पुढील प्रमाणे.**

## आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आमदारकीचा राजीनामा द्यावा; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



पंढरपूर/राजेंद्र कोरके पाटीलः धैर्यशील मोहिते पाटील यांची गुन्हेगारी पार्श्र्वभूमी आणि आर्थिक दृष्ट्या ठेवलेला कारभार यामुळे विरोधी पक्षाला भक्कम मुद्दे आहेत त्यामुळे पवारासोबत धैरशील यांना उमेदवारी देण्यासाठी नाकुस्तर होतेच परंतु आमदार रणजीचे मोठेपण यांच्यासह शिवरत्न च्या सर्व सदस्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करावा अशी शरद पवारांची अट घातली आहे मोहिते पाटलाचा खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांना यांना वाढता विरोध आणि त्यांची तुतारीकडील ओढ पाहून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रणजीत सिंह मोहिते पाटलांना आमदारकीचा राजीनामा द्या द्या तर किंवा भाजपचे काम करा असा सक्त इशारा दिला आहे.

कार्यकर्तृत्व शून्य असल्याने धैर्यशील मोहिते पाटील पवारांच्या वेटिंग लिस्टमध्ये चौथ्या स्थानावर होते तर महादेव जानकर हे पोरांच्या पहिल्या लिस्टमध्ये होते. दोन नंबरला स्वर्गीय गणपतराव देशमुख यांची नातू होतेक्ष तीन नंबरला संजू राजे निंबाळकर होती व चार नंबरला धैरशील मोहिते पाटील यांचे नाव होते

दरम्यानच्या संजय राजे आणि धैरशील यांनी आपापसात चर्चा करून तुतारीवर कोणाला लढवायची हे ठरवायचे असे म्हणून शरद पवारांनी इथेही यांना स्वतःची जागा आणि त्यांना दाखवली वास्तविक पाहता जैसे आणि धैर्यशील यांनी आजपर्यंत माताच्या जोरावर ब्लॅकमेलिंग चे राजकारण केले या काका पुतण्याचे फायदा तिथेच विकास केल्याचा इतिहास आहे जैसे आणि बारामतीच्या उमेदवार आणि वाढणार आहे असे वक्तव्य केल्याने हे वाक्य हुकूम उपमुख्यमंत्र्यांशी अजित पवारांच्या खूपच जवारी लागल्याने त्यांचे माढा लोकसभा मतदारसंघात खूपच लक्ष असल्याचे समजते

आयेशा केटरर्स कार्यकर्त्यांच्या गोटातून माहिती अनुसार विद्यमान आमदार रणजीत सिंह यांना भाजपच्या व्यासपीठावरून खासदारकी रणजीत सिंह प्रचारासमवेत प्रचार स्टार प्रचार प्रचारक म्हणून करावा लागणार आहे परंतु धरेशन यांनी वाड्यामधून निवडणूक लढवण्याची ठरवले असल्याने तेथील कार्यकर्त्यांनी तुतारीची प्रचार । पान २ वर

# संपादकीय

## हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने केलेल्या कारवाईनंतर तिहार जेलमध्ये जाण्याची पाळी यावी, हे मोठे दुर्दैव म्हटले पाहिजे. लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर केजरीवाल यांना अटक होऊन त्यांची रवानगी जेलमध्ये झाली. म्हणून इंडिया आघाडीतील पक्षांनी आदळ-आपट सुरू केली आहे. भाजपने विरोधकांना संपविण्याचे कारस्थान रचले आहे, असा टाहो काँग्रेसपासून सर्व भाजपविरोधी पक्ष फोडत आहेत. पण केजरीवाल हे ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही चौकशीला सामोरे गेले नाहीत, हे कोणी सांगत नाहीत. केजरीवाल हे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांना कायदा उल्लंघन करण्याचे घटनेने चिलखत दिलेले नाही. दिल्लीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारमधील तीन मंत्री अगोदरपासूनच जेलमध्ये आहेत. आता केजरीवाल यांची त्यात भर पडली आहे. ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत केजरीवाल यांना मोदी सरकारने जेलमध्ये पाठवले म्हणून त्यांना व त्यांच्या पक्षाला थोडी फार सहानुभूती मिळू शकेल, पण कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका कशी होऊ शकेल? दिल्ली सरकारने बनविलेल्या नवीन मद्य धोरणातून त्यांना व त्यांच्या पक्षाला जवळपास साडेतीनशे कोटी रुपये लाच म्हणून पैसे मिळाले, हा आरोप त्यांना न्यायालयात खोडून काढावा लागेल. केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीला महाराष्ट्रातले नेतेही सामोरे गेले होते. केजरीवाल यांना ईडीने नऊ वेळा समन्स बजावूनही ते चौकशीला गेले नाहीत. ईडीच्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आपल्या अटकेच्या कारवाईवर स्थगिती द्यावी, अशी मागणी केली होती, आपण ईडीकडे चौकशीला जाण्यास तयार आहोत. पण त्यांनी आपल्याला अटक होणार नाही, असे आश्वासन द्यावे अशी केजरीवाल यांनी कोर्टाकडे मागणी केली होती. उच्च न्यायालयाने त्यांच्या मागण्या फेटाळून लावल्या आणि ईडीचे पथक त्यांच्या निवासस्थानी दरवाजात उभे राहिले. केजरीवाल हे निर्दोष आहेत की ईडीच्या म्हणण्याप्रमाणे मद्य घोटाळ्याचे प्रमुख सूत्रधार आहेत, हे न्यायालय ठरवेल. पण राज्याच्या मुख्यमंत्र्याला त्यांच्या घरी पोलीस आणि ईडीचे अधिकारी येऊन अटक करतात, यातून मुख्यमंत्रिपदाची बेईज्जती होते, हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

## तरुणांच्या देशात तरुणांच्या हाती काय?

भारतीय लोकशाही जगातील सर्वात सुंदर व मजबूत लोकशाही आहे. संविधानानुसार लोकशाहीची अंमलबजावणी केली तर लोकशाही च्या जोरावर भारत जगावर राज्य करू शकतो. परंतु भारतात विषमता एवढी खोल रुजलेली आहे की माणूस माणसाचा द्वेष करून जाती धर्माच्या नावावर माणूस माणसासोबत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष लढत आहे. छत्रपती शाहु महाराज यांची खंत होती की आज ज्यांच्या हातात धर्मसत्ता आहे त्याच लोकांच्या हातात स्वतंत्र देशाची जाऊ नये. धर्मसत्तेवर वर्चस्व असलेल्या लोकांच्या हाती स्वतंत्र भारताची सत्ता गेली तर सर्वसामान्य माणसाला न्याय मिळणार नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एक खंत होती की संविधान कितीही चांगले असले तरीही ते राबणारे लोक चांगले नसतील तर त्याचा फायदा लोकांना होणार नाही. या दोनही महापुरुषांची खंत आजही तंतोतंत वास्तवात उतरली आहे. ब्रिटीशांच्या गुलामगिरी मधुन आपल्याला स्वातंत्र्य तर मिळाले पण राजकारणी लोकांच्या गुलामीमध्ये अडकून बसलो. राजकीय नेत्यांची गुलामीने माणूस एवढा लाचार व बुद्धीहीन झाला की त्याला वास्तव परिस्थिती समजून घ्यायला वेळच नाही. नेते सांगतील तेच अंतिम सत्य समजणारे अनेक भक्त निर्माण झाले. जे लोक जागृत व देशाप्रती इमानदार आहेत. जात, धर्म, नेत्यांची भक्ती यापुढे जाऊन सामाजिक समस्यांचे निराकरण होऊन संविधानाची अंमलबजावणी होऊन सर्वांगीण विकास व्हावा, शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा व इतरही मुलभूत सुविधा प्रत्येक नागरिकांना मिळाव्यात. शासन प्रशासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ देशातील नागरिकांना समान पात्रतेवर मिळावा या साठी बोलणारा, लिहणारा, निरपेक्ष व परखड मत मांडणारा व्यक्ती भक्तांना धर्म विरोधी, नेता विरोधी वाटतो. मुळात भारत देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो परंतु देशात जर बघीतले तर तरुणांच्या हाती काय आहे? तरुणांच्या हाती गुणवत्तेचे शिक्षण असायला पाहिजे, तरुणांच्या हाती रोजगार असायला पाहिजे, तरुणांच्या हाती देशाच्या हिताचे निर्णय घेण्याचा अधिकार पाहिजे. परंतु वास्तवात तरुणांच्या हाती बेरोजगारी आहे, हप्त्यावर घेतलेला मोबाईल आहे, दोन जिबी डाटा आहे, नेत्याचा आदेश आला की हातात दगड आहे जो जाती धर्माच्या नावाखाली फेकून तरुणांचे आयुष्य उध्वस्त व नेत्यांच्या आदेशाचे पालन करते. तरुणांच्या हाती दारुची बाटली आहे, तरुणांच्या हाती नशेची पुडी आहे. तरुणांसमोर खुप समस्या आहेत. शासकीय नोकरी नाही म्हणून तरुणांचे लग्न होत नाहीत. तरुणांच्या लग्नासाठी किती मेहनत घ्यावी लागते हे तरुणांना व त्यांच्या घरच्यांनाच माहिती असते. तरुणांच्या देशात तरुणांच्या समस्या जास्त का आहेत तर तरुणांच्या हाती सत्ता नाही, तरुणांच्या हाती देशाच्या हिताचे निर्णय घेण्याचा अधिकार नाही. देशात संविधान लागु झाले आणि लोकशाही निर्माण झाली परंतु देशात अनेक धर्मग्रंथांनी माणासाला माणूस म्हणूनही नाकारले होते, माणसाचा माणसाला विटाळ होईल अशी निच संस्कृती येथे पेरली होती, माणसाला अज्ञानात ठेवून त्यांना माणसिक गुलाम बनवून त्यांचे शोषण करणाऱ्या धुर्त लोकांना लोकांचे कल्याण व लोकांना हक्क अधिकार मिळणे, सर्वांना समान दर्जा व संधी निर्माण करणे म्हणजे धर्म विरोधी वाटून स्वतः ची तळफळाट होत होती. म्हणून संविधान लागु होऊनही, संविधान प्रत्येकांच्या उद्धाराचे माध्यम असतानाही संविधानाची जनजागृती झाली नाही, संविधाना बद्दल आजही लोकांना आदर नाही हे सर्व जाणीव पुर्वक करण्यात आले. लोकांना लोकशाही व संविधान कळूच नये याचे पुर्ण नियोजन केले गेले. याचाच परिणाम लोकशाही असुनही लोकांनी घराणेशाही जोपासली. धर्मसत्ता ज्यांच्या हाती होती त्यांच्या च हाती राजसत्ता असल्याने लोकशाही संपवण्याचे पद्धतशीर पणे सुरू केले. बहुतांश राजकीय पक्ष विशिष्ट जातीच्या लोकांचेच, पक्षाचे उमेदवार विशिष्ट जातीचेच, ज्यांनी विषमता, अंधविश्र्वास, अस्पृश्यता पाळून मानसाला माणसाजवळ येऊ दिले नाही ते लोक संसदेमध्ये जातात. निरपेक्ष, वैचारिक व लोककल्याण करणारे नेते संसदेत कमी असल्याने लोकशाहीचा गैरवापर करून बहुमताच्या आधारे लोकहीताच्या विरोधात जास्त निर्णय घेऊन सर्वसामान्य लोकांच्या समस्या वाढवण्यासाठी याच लोकांनी मदत केली. वर्षानुवर्षे एकाच घरातील आमदार खासदार असताना ही अजूनही त्या मतदारसंघात रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य सुविधा नसतील आणि आमदार खासदारांच्या संपती मध्ये हजारो पटीने वाढ होत असेल तर ही कमाई ईमाणदारीची असेल का? हा प्रश्र्न ही विचारण्याची हिंमत आजच्या तरुणांमध्ये आहे का? शिक्षण घेऊनही डोक्याचा वापर न करणाऱ्या आणि सत्याचा स्विकार न करता चुकिच्या गोष्टी, अंधविश्र्वास आणि नेत्यांची गुलामी करण्यात धन्यता माणणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. तरुणांना नको त्या विषयामध्ये गुरफटून ठेवून महत्वाच्या विषयाची तरुणांना जाणिवच होऊ नये यासाठी पुर्ण नियोजन केले जाते. आता तर व्हाट्सएप युनिव्हर्सिटी वर तरुणांना विद्वान बनवण्याचे काम सुरू आहे. तरुणांचे प्रश्र्न मांडण्यासाठी, तरुणांच्या समस्या सोडविण्यासाठी तरुण उमेदवार घराणेशाही मोडीत काढून काम करणाऱ्या लोकांना संधी देणे आवश्यक असताना म्हाताऱ्या लोकांना पक्ष उमेदवार जाहीर करून म्हातारे लोक तरुणांचा रोजगार, पेन्शन, शिक्षण बंद करून म्हाताऱ्या आमदार खासदारांचा पगार, पेन्शन भरगच्च करून खाजगीकरणाच्या माध्यमातून आमदार खासदार यांच्या च महाग शिक्षणसंस्था उदयास येत आहेत. आमदार, खासदारांच्या शिक्षण संस्था, पतपेढी याठिकाणी कर्मचाऱ्यांना कमी पगार देऊन जनकल्याण करतात. जे लोक जनतेचा पैसा स्वतः कडे वळून त्यातून बँक, शिक्षणसंस्था व इतर उत्पन्नाचे साधन उपलब्ध करत असतील आणि कामगारांना वेळेवर कमी आणि वेळेवर पगार देत नसतील तर ते किती जनकल्याण करत असतील याची जाणीव होते. एवढे असुनही तरुणांना तेचे नेते, तेच पक्ष जर आपले वाटत असतील तर हे तरुणांच्या बौद्धिक मागासले पणाचे लक्षण आहे. सोशल मिडिया चा वापर करून नेत्याची भक्ती करून एकमेकांना सोबत वाद घालणारे कार्यकर्ते यांना नेते कोणतेही असो, पक्ष कोणताही असो दिवसभर विरोधात बोलताना जरी दिसत असले तरीही रात्री ते सोबतच जेवन करतात आणि तरुण मात्र वैयक्तीक वाद वाढवून स्वतः चे नुकसान करून नेत्याप्रती ईमानदार असल्याचे भासवतात. राजकीय नेत्यांमुळे, त्यांच्या भ्रष्टाचारामुळे तरूण बेरोजगार आहेत, शेतकरी फासावर चढत आहेत, महिला सुरक्षित नाहीत, शिक्षणाचे बाजारीकरण झाले, मतदारसंघाती वेगवेगळे कंत्राट जवळच्याच लोकांना देऊन बाकीच्या लोकांना भिकेला लावणारे नेते होतात तरी कसे? आणि अशा लोकांना डोक्यावर घेऊन मिरवताना आपल्या अडचणी त नेता आपल्याला न ओळखतही नसताना नेत्यांना डोक्यावर घेण्यात कोणते शहाणपण असेल? राजकीय सत्तेचा, लोकशाही चा बहुतांश तरुणांना फायदा होत नसेल आणि लोकशाही चा गाभा समजल्या जाणाऱ्या निवडणूक मध्ये इव्हिएमच्या माध्यमातून मतांची हेराफेरी होत असेल, आणि बहुतांश जनसमुदाय इव्हिएम विरोधात असताना केवळ राजकीय झोळी भरून घेण्यासाठी आणि लोकशाहीची हत्या करून हुकुमशाही लागु होत असेल तर या मध्ये तरुणांचा फायदा तर नाहीच पण देशाची अधोगती मात्र निश्र्चितच आहे. राजकीय पक्ष तरुणांना संधी देतो म्हणतात परंतु तरुणांचा वापर फक्त दंगली आणि सभेमध्ये गर्दी जमण्यासाठीच होतो. म्हणून एकाही राष्ट्रीय पक्षाचा अध्यक्ष हा तरुण नाही. घरात बापाला काही समजत नाही म्हणून बापाला शिव्या देऊन लाता मारणारे मात्र राजकीय नेत्याच्या पायावर नतमस्तक होतात तेव्हा गुलामी मजबूत झाल्याची जाणीव होते. एकाच घरातील नेते होत असतील आणि एकाच जातीच्या हातात बहुतांश सत्ता असेल तर तेथे लोकशाही आहे असे कसे म्हणता येईल? एखाद्या ची संख्या जास्त असेल आणि शासन प्रशासन मध्ये संख्या जास्त असेल तर काही वावगे नाही. परंतु संख्येने कमी असून मोक्याच्या जागेवर जास्त प्रमाणात असतील तर लोकशाही मध्ये केलेला सर्वात मोठा भ्रष्टाचार असेल. म्हणून देशाचा व जनतेचा विचार केला तर लोकशाही चा खऱ्या अर्थाने ज्यांना फायदा व्हायला पाहिजे त्यांना झालाच नाही. तरुणांचा देश जरी असला तरीही तरुणांच्या हाती काय आहे. हा गंभीर प्रश्र्न देशाचे वास्तव चित्र दाखवतो.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी ..

करण्यास सुरुवात केला आहे आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील त्र धैरशील मोहिते पाटलाच्या समर्थकाने तुतारीचा जोरदार प्रचार सुरू आहे तरीही आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील यांना थांबू शकत नसल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रणजीत सिंह मोहिते पाटलांना आमदारकीचा राजीनामा द्यायला लावल्याची खात्रीशीर सूत्राकडून समजते तरी रणजीत सिंह मोहिते पाटलांना आमदारकीचा राजीनामा द्यायला असल्याने खात्रीला एक सूत्राकडून सांगितले.दरम्यान राजकीय स्वार्थापोटी धैर्यशील गोविंद बागेच्या पानवट्यावर गेल्यामुळे न्यायला शरद पवारांनी त्यांना बुडता जहाज घेतली तरी मोहिते पाटलाची राजकीय अस्तित्व मातीमोल झाल्याशिवाय राहणार नाही असे राजकीय जाणकाराकडून बोलले जात आहे

### विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार ..

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघ संदर्भ पुस्तके चे कौतुक करून ही पुस्तिका सर्व प्रसार माध्यमे त्यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे या पुस्तिकेमध्ये लोकसभा निवडणूक सन १९८० ते २०१९ पर्यंतच्या सोलापूर जिल्ह्यातील दोन्हीही लोकसभा मतदार संघात उमेदवारांना मिळालेल्या मतांची माहिती देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणेच सर्व निवडणूक संबंधी काम करणाऱ्या शासकीय यंत्रणेला तसेच उमेदवार व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना यातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निवडणूक तसेच निवडणुक संबंधी स्थापन करण्यात आलेल्या संबंधित कक्षाचे सर्व नोडल अधिकारी यांचे संपर्क क्रमांक ही यामध्ये देण्यात आलेले असल्याने ही पुस्तिका सर्वांसाठी उपयुक्त ठरेल असेही त्यांनी सांगितले.

यामध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२४ सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय संपर्क क्रमांक, सोलापूर जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय संपर्क क्रमांक, लोकसभा निवडणूक २०२४ साठी नियुक्त नोडल अधिकारी यांची यादी, निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची यादी, निवडणूक आदर्श आचारसंहिता मार्गदर्शक तत्वे, राजकीय पक्ष उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचारसंहिता, वृत्तपत्रांसाठी प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्वे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, पेड न्यूज, सोशल मीडिया सह राजकीय जाहिरातीचे पूर्व प्रामाणिकरण, सोशल मीडियासह इंटरनेटवरील मजकुराशी संबंधित आदर्श आचारसंहिता, मतदानासाठी ग्राह्य असलेली ओळखपत्रे, निवडणूक विषयक वेबसाईट व मोबाईल प्लिकेशन्स आदीची माहिती देण्यात आलेली आहे.

### खरगेंची मानसिकता तुकडे-तुकडे ..

त्यांच्या नेत्यांनी लोकांना सांगावे की त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान जम्मू आणि काश्मीरमध्ये पूर्णपणे राबवता का आले नाही? हे करण्यासाठी मोदींची गरज का पडली?'' या वेळी त्यांनी कर्नाटकचे काँग्रेस खासदार डी के सुरेश यांच्या स्वतंत्र दक्षिण भारताच्या विधानाचाही संदर्भ दिला. यावरून काँग्रेसची मानसिकता समजते असा दावा मोदींनी केला. भाजपचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी आरोप केला की, ''काश्मीरच्या विलीनीकरणाचा इतर राज्यांशी काय संबंध असे जर काँग्रेस पक्ष म्हणत असेल तर त्यांना देशाच्या एकता आणि अखंडत्वासाठी घेतलेल्या शपथेविषयी कोणताही आदर नाही.'' काँग्रेसने राष्ट्रीय पक्ष म्हणून स्थान जवळपास गमावलेच आहे, आता नैतिकदृष्ट्या त्यांनी राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वात उरण्याचाही अधिकार गमावला आहे.

### लोकसभा निवडणुकीसाठी

मतदारांच्या दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्केपेक्षा जास्त असेल अशा मतदारांपैकी इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे गृह मतदानाची सुविधा उपलब्ध होणार आहे.भारत निवडणूक आयोगाने या वर्षी दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढावा या हेतूने 'सक्षम' हे ॲप उपलब्ध करुन दिलेले आहे.

त्या माध्यमातुन तसेच विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या कालावधीत दिव्यांगांसाठी विशेष शिबिरे राबवून जास्तीत जास्त दिव्यांग मतदारांची नोंदणी करुन घेण्यात आली आहे. आजमितीस ६,०४,१४५ इतक्या मतदारांची नावे त्यांच्या मागणीनुसार दिव्यांग मतदार म्हणून चिन्हांकित करण्यात आली आहेत.

### 'बेरोजगारी हा निवडणुकीतील मोठा

युवकांचे भविष्य कसे उद्ध्वस्त केले आहे त्याची कल्पना करता येईल.'' मोदी सरकारच्या कारकीर्दीत २०१४पासून तरुणांमधील बेरोजगारीचा दर तिप्पट झाला आहे, अशी टीका खरगे यांनी केली. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रसिद्ध केलेल्या भारत रोजगार अहवालात असे दिसून येते की, भारतात दरवर्षी ७० ते ८० लाख नवीन मजूर तयार होतात, पण २०१२ ते २०१९ या कालावधीत रोजगारीत जवळपास शून्य वाढ झाली, असे त्यांनी नमूद केले.

### मराठी नववर्ष आणि गुढीपाडवा ..

येणार आहे. याशिवाय, पत्राशेड व दर्शनमंडप येथे आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे.मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्ययावत रूग्णवाहिका ठेवण्यात येत आहेत. गर्भगृहाचे काम सुरू असल्याने, पदस्पर्श दर्शन बंद आहे. त्यामुळे पदस्पर्शदर्शन सुरू होईपर्यंत भाविकांच्या हस्ते पुजा बंद करण्यात आलेल्या आहेत.

नजीकच्या काळात होणारी चंदनउटी पुजा देखील मंदिर समिती मार्फत करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले. असे असले तरी मराठी नव वर्षा निमित्त भाविकांना सावळ्या विठुरायाचे लांबून का होईना दर्शन घेवून नव वर्षाचा संकल्प सोडता येणार असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही

## माढा व सोलापूर लोकसभा मतदारसंघात ७ मेला सार्वजनिक सुट्टी

सोलापूर/प्रतिनिधीः लोकशाहीच्या सर्वात मोठ्या निवडणुकीच्या उत्सवात मतदान करण्यासाठी देशांतील सर्व नागरिकांना सहभागी होता यावे. कोणीही मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी ७ मे रोजी मतदानादिवशी सार्वत्रिक सुट्टी असणार आहे. त्यातील तिसऱ्या टप्प्यात निवडणूक होणार्या सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व माढा या दोन्ही लोकसभा मतदारसंघाचा सहभाग आहे. भारत सरकार गृहमंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र शासनातर्फे ही सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी लोकसभा मतदारसंघ ४२-सोलापूर व ४३- माढा या क्षेत्रांतील जे मतदार कामासाठी त्या त्या मतदारसंघाबाहेर असतील त्यांना देखील लागू राहील. तसेच ही अधिसूचना राज्य व केंद्र शासनाच्या कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम व इतर प्रतिष्ठान यांनाही लागू राहील.या निमिताने सोलापूरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, भारत निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल अधिकारी संदीप कोहिनकर, निवडणूक साक्षरता मंडळ वर्शिप अर्थ फौंडेशनचे सोलापूर जिल्हा समन्वयक सोमनाथ पवार यांनी सोलापूर व माढा मतदार संघातील सर्व मतदारांना आवाहन केले आहे.

मतदानदिनाच्या सुट्टीदिवशी सर्वांनी देशहिताच्या या पवित्र कार्यात मतदान करून सहभागी व्हावे. लोकशाहीने आपल्याला बहाल केलेले बहुमोल मत मतदानाच्या रुपात दान करून भारत देशाची लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आपले अनमोल व भरीव योगदान द्यावे. आपला हक्क व अधिकाराची अंमलबजावणी करावी, असं आवाहन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

लोकसभेच्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी खूप कमी आहे. त्यात वाढ व्हावी, सर्वांन मतदान करून ही टक्केवारी १०० व्हावी यासाठी मतदानादिवशी सर्वांना सुट्टी असेल असे भारत निवडणूक आयोगाचे स्वीप नोडल ऑफीसर तथा सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर विभागाचे प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ. सुधीर ठोंबरे यांनी दिली. दरम्यान, मतदान केल्यानंतर ज्याना कामावर जायचे ते खासगी क्षेत्रातील लोक पुन्हा कामावर जाऊ शकतात, असंही त्यांनी सांगितलं.

## मनोज जरांगे यांचा छगन भुजबळांना अप्रत्यक्ष इशारा

मुंबई : लोकसभेची निवडणूक जाहीर झाली. मात्र, महायुतीच्या काही मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा अद्याप जाहीर झालेली नाही. महायुतीमध्ये नाशिक लोकसभा मतदारसंघाच्या जागेचा तिढा अजून सुटलेला नाही. यातच शिवसेना आणि भाजपामध्ये येथील जागा लढविण्यासाठी रस्सीखेच सुरु आहे.

नाशिकमधून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ हे महायुतीकडून निवडणूक लढविणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. या पार्श्र्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी भाष्य करत छगन भुजबळ यांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे.मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांपासून लढा देत आहेत. काही दिवस त्यांनी उपोषण, आंदोलन केले. मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला छगन भुजबळ यांनी विरोध करत मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास विरोध केला होता. यावरुन मनोज जरांगे आणि छगन भुजबळ यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपही सुरु होते. दरम्यान, आता नाशिकमधून छगन भुजबळ यांना महायुतीकडून उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा आहे. यावर मनोज जरांगे यांनी माध्यमांशी बोलताना इशारा दिला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वेदश्री तपोवन मध्ये आरंभ फाउंडेशनच्या माध्यमातून अजान वृक्षाचे वृक्षारोपण



नाशिक/प्रतिनिधीः वृक्षवल्ली आम्हा सोयरी... जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या या अभंग अंगीकारत, आरंभ फाउंडेशन अनेक वर्षापासून बीज संकलन ,वृक्षारोपण, संवर्धन सेवा कार्य करत आहे. त्यातूनच परमपूज्य स्वामी गोविंदगिरीजी महाराज (कोषाध्यक्ष - श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास आयोध्या) स्वामीजींचे असीम वृक्ष प्रेम , संत ज्ञानेश्र्वर भक्ती पाहता त्यांच्या अमृतजन्मोत्सव वर्षा निमित्त आरंभ फाउंडेशने सत्कार करत स्वामीजींच्या भेटीला आले संतरुपी वृक्ष या संकल्पनेतून वेदश्री तपोवन मोशी येथे परमपूज्य स्वामींच्या हस्ते माऊलींचा आराध्य वृक्ष अजान, तुकाराम महाराजांचा आराध्य वृक्ष नांदूरकी, अमृताचा पुतळा सोनचाफा, कलियुगी अन्नदाता फणस , पक्षांची रसवंती गृह पांगिरा या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्षा वैष्णवी पाटील यांनी सांगितले की, अध्यात्मात ,भारतीय संस्कृतीमध्ये वृक्षांना महत्व आणि त्याचे दैवत्व वेळोवेळी सांगितलेले आहे. अजान हा वृक्ष साधकांसाठी योगवल्ली वृक्ष आहे. या मठामध्ये गीतेचा, वेदांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना ,साधकांना त्याचा लाभ व सहवास मिळावा.संत एकनाथ महाराज म्हणतात ,अजान वृक्षाची पाने जाण जोश्र भक्षून करील अनुष्ठान श्रश्र त्यासी साध्य होईल ज्ञानश्र तेथे संशय नाही श्रश्र म्हणून अशा दुर्मिळ वृक्षांचे संवर्धन व्हावं, त्याचं महत्त्व पटावं यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान व गीता परिवार यांच्याकडून वृक्ष संवर्धनामध्ये कार्य करणारे वनश्री रघुनाथ ढोले सर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर आरंभ फाउंडेशन ,गीता परिवार मोशी यांच्या कार्याची दखल घेऊन स्वामीजींच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळेस संस्थेच्या अध्यक्षा वैष्णवी पाटील, चाफा मॅन भोलेश्र्वर पलंगे ,जालिंदर शिंगारे ,तानाजी भोसले, शरद भाला ,वंदना तांबे, कल्पना शिंगारे, माणिक खराडे ,उमेश पवार, मच्छिंद्र घनवट, शशिकांत तांबडे,रूपाली पाटील ,शुभांगी पवार ,स्नेहल पंडित , वृषाली आटोले,वैशाली गायकवाड, श्रावणी पाटील, जान्हवी पवार सदस्य तसेच तपोवनचे व्यवस्थापक वेदमुनी नंदे गुरुजी, श्रीपाद देशमुख, अविनाश मोरे काका, भगवान जोशी गुरुजी उपस्थित होते. छोटे निसर्ग प्रेमी श्रावणी पाटील हिने स्वामीजींना वाढता उन्हाळा पाहता पक्षांसाठी जलपात्र भेट दिले.अशाप्रकारे आध्यात्मिक व पर्यावरण क्षेत्रातील सेवेकरांची मांदियाळी एकत्र आली होती.

# व्यापाऱ्यांनी शेतकरी वर्गास वेटीस धरू नये: अनिल पा.कुंदे

## पाडव्याच्या शुभ दिनी बाजार समिती सुरू करा : बाळासाहेब क्षीरसागर

निफाड/प्रतिनिधीः पाच मे.पर्यंत जर व्यापाऱ्यांचा निर्णय झाला नाही तर तुम्ही अनेक महिने बाजार समित्या बंद ठेवणार का? आचारसंहितेचा काळ असून याबाबत कुठलाही निर्णय लागणार नाही, तरी व्यापारी वर्गाने. शेतकरी वर्गाचे जे नुकसान होत आहे, त्यापासून शेतकऱ्यांना वाचवावे शेतकरी वर्गाची मोठी हानी होत असून व्यापाऱ्यांनी शेतकरी वर्गास वेठीस धरू नये, असा इशारा निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांनी व्यापारी वर्गास दिला आहे अन्यथा या विरोधात वेगळ्या पद्धतीने आंदोलन करावे लागेल असे ते म्हणाले,

व्यापारी व माथाडी यांच्या नेव्हीच्या प्रश्नावरून नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या बंद असून लासलगाव, पिंपळगाव ,व निफाड बाजार समिती बंद आहे, व्यापारी वर्गाने निफाड बाजार समिती बंद न करता ती सुरू करावी यासाठी निफाड बाजार समितीच्या हॉलमध्ये सभापती बाळासाहेब शिरसागर, निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांचे प्रमुख उपस्थितीत व्यापारी वर्गासोबत बैठक बोलविण्यात आली होती.याप्रसंगी अनिल पा. कुंदे बोलत होते. मोठ्या व्यापाऱ्यांनी इतर व्यापाऱ्यांना




समाविष्ट करून जिल्हा व्यापारी असोशियनने या व्यापाऱ्यांना बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यास भाग पाडले असे वाटते .बाजार बंद ठेवणे हा निर्णय शेतकरी वर्गाच्या दृष्टीने चुकीचा असून मार्च एंड चा काळ असतांना कांदे न विकल्यामुळे त्याला पैसे भरता आले नाही, माल विकता आला नाही, अशा पद्धतीने बाजार बंद राहिले तर शेतकरी वर्ग उद्धस्त होईल, व्यापाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाला अधीन राहून बाजार समिती सुरू करा इतर बाजार समिती मध्ये जाऊन तुम्ही माल खरेदी करतात मग निफाड बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांना माल खरेदी करण्यास का मान्य नाही असा प्रश्न यावेळी त्यांनी केला, व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांस वेठीस धरू नका हा प्रकार चुकीचा असून आम्हाला वेगळ्या पद्धतीने आंदोलन करावे लागेल असा इशारा अनिल पा. कुंदे यांनी दिला असून बाजार समितीचे सभापती बाळासाहेब शिरसागर यांनी पाडव्याच्या शुभ दिनी बाजार समिती सुरू करा असा व्यापाऱ्यांना आदेश दिला आहे, याप्रसंगी मोतीराम मोगल, अजय सोनी, आनंद दायमा, सुदर्शन भुतडा, अभय सुराणा ,पुष्कर रुणवाल ,नितीन व्यवहारे, विठ्ठल सानप ,हरिभाऊ सानप, कमलेश जैन, बापू निकम ,भुवनेश्र्वर सारंगधर ,तसेच व्यापारी व शेतकरी वर्ग उपस्थित होता

# आ.प्रणिती शिंदे यांनी घेतली राजू खरे यांची भेट

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूरची सुपुत्र उद्योजक राजू खरे आपली राजकीय ताकद वाढविली आहे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मोहोळ व पंढरपूर आणि उत्तर सोलापूर भागात खरे यांना मानणारा मोठा वर्ग तयार झाला आहे त्यामुळे उमेदवार गोपाळपूर येथील फार्म हाऊसवर जाऊन रविवारी दुपारी भेट घेतली आहे आमदार पनीती शिंदे यांचा पंढरपूर ग्रामीण भागात गाव भेट दौरा सुरू आहे अशातच त्यांनी राजीव खरे गोपाळपूर येथे असलेली माहिती मिळतात आमदार पणती शिंदे यांनी आपल्याला या निवडणुकीत साथ देण्याबाबत विनंती केली आहे त्यासाठी खरे समर्थक कार्यकर्त्यांनी जवळपास सहमती राजू करे हे मागील ते तीस वर्षांपासून कडवट शिवसैनिक आहे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची समर्थक आहे त्यामुळे पर्यायाने माहितीचे महत्वपूर्ण नेते आहेत तरीही काँग्रेसला उमेदवार आमदार पनीती शिंदे यांनी भेट घेतल्याने खरे यांच्या राजकीय तारखेला महत्त्व माहिती जिम्मेदार आमदार राम सातपुते यांनी उमेदवारी मिळतात सोलापूर जिल्ह्यातील माहितीच्या स्वर आमदारांनी नेत्यांची भेट घेतली मात्र शिवसेना नेते आणि मोहा विधानसभा मतदारसंघावर आपली पकड मजबूत केलेली राजू खरे यांना आपली भेटली नाही म्हणून खरे समर्थ कार्यकर्त्याकडून आघाडी नाराजी पसरली होती याचाच फायदा उठवण्याचे आमदार प्रणिती शिंदे यांनी घेतलेली भेट त्यामुळे खरे समर्थ कार्यकर्ते या भेटीनंतर खरे परिवाराचे आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्व सन्मान करण्यात जंगी स्वागत केले यावेळी तृप्ती ताई राजू खरे यांनी सत्कार केला यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जाधव शिवसेना उभा टाकायची जेवण माने सुधीर अभंगराव काँग्रेसचे बजरंग बागल यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते तसेच कर यांचे समर्थक मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

# सुदृढ भारतासाठी सामुदायिक प्रयत्नांची आवश्यकता जागतिक आरोग्य दिनाच्या चर्चासत्रातील सूर

सोलापूर/प्रतिनिधीः जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्य दिनानिमित्त माझे आरोग्य, माझे अधिकार हे घोषवाक्य दिले असले तरी जिथे अधिकार येतात तिथे मानवी कर्तव्य येतात आणि ही कर्तव्य प्रत्येकाला पार पाडावी लागतील म्हणून सुदृढ भारतासाठी सामुदायिक प्रयत्नांची आवश्यकता आहे असा सूर श्री. सिद्धेश्र्वर वूमेन्स कॉलेज ऑफ इंजिनीरिंग मध्ये जागतिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित चर्चासत्रात निघाला. सोलापूर शहरातील प्रसिद्ध ख्यातनाम पॅथॉलॉजिस्ट व इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, सुप्रसिद्ध कॅन्सर सर्जन तथा सोलापूर कॅन्सर सोसायटीचे सचिव डॉ. शिरीष कुमठेकर व फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे मार्गदर्शन या चर्चासत्रात आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण हे होते. इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर स्टारलेट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर




शाखा व श्री. सिद्धेश्र्वर वूमेन्स कॉलेज ऑफ इंजिनीरिंग, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा.डॉ. एन. बी.तेली, इनरव्हील क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा काजल सिंदगी, शिल्पा लिंगशेट्टी, प्रा. एस. एम. गुंगेवाले, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

डॉ. राजीव प्रधान बोलताना म्हणाले की, प्रत्येकाला स्वच्छ पाणी, शुद्ध हवा, चांगल्या आरोग्यासाठी उत्कृष्ट आरोग्यसेवा, स्वच्छ व चांगला परिसर, राहण्यासाठी चांगली व्यवस्था हवी असते आणि हे मिळविताना प्रत्येकानी कर्तव्य ही पार पाडली पाहिजेत. पूर्वी भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान ३५ वर्ष होते ते आज ६० च्या पुढे गेले आहे. भारतात आरोग्य सेवा सुविधा सहज उपलब्ध झाल्यामुळे हे शक्य झाले आहे. विदेशा पेक्षा भारतात आजही आरोग्य सेवा स्वस्त आहेत. राष्ट्रीय कार्यक्रमात लहान बाळांचे लसीकरण, विविध रोगावर कमीदरात उपलब्ध लसी, गरोदर व स्तनदा महिलांच्या नियमित तपासण्या व औषधोपचार, प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये विविध मोठ्या शस्त्रक्रियांसाठी आयुष्यमान भारत योजना, महात्मा फुले आरोग्य योजना, कॅन्सर वरील विमा पॉलिसी, मुख्यमंत्री आरोग्य सहायता निधी अश्या योजना उपलब्ध झाल्याने आरोग्य सेवा घेणे सहज सोपे झाले आहे. डॉ. शिरीष कुमठेकर म्हणाले की, प्रत्येक जण जन्माला येताना आरोग्याची कवच कुंडले घेऊन जन्माला येतो. मनुष्याला आपल्या जीवनात हवा, पाणी, सूर्यप्रकाश, आई-वडील, देह, बायको, सल्ला फुकट मिळतो आणि जे फुकट मिळते त्याची किंमत आपल्याला नसते. जन्म आणि मृत्यू हे जरी आपल्या हातात नसले तरी या दोन्ही मधला काळ आपल्या हातात नक्की असतो. तो काळ निरोगी ठेवण्यासाठी दिवसातून ७ ते ८ तास पुरेशी विश्रांती, रोज किमान २० ते ३० मिनिटे व्यायाम, सात्विक चौरस आहार, सकारात्मक विचारसरणी, वैयक्तिक व परिसर स्वच्छता आणि कुठल्याही व्यसनापासून लांब राहने ही कर्तव्य प्रत्येकाने पार पाडली पाहिजे.

डॉ. श्रीकांत येळेगावकर आपल्या प्रबोधनात म्हणाले की, कुठल्याही देशाला महासत्ता बनायचे असेल तर त्या देशाच्या जीडीपीच्या सहा टक्के पेक्षा अधिक खर्च शिक्षण आणि आरोग्यावर झाला पाहिजे. ज्या देशाचे आरोग्य चांगले असते तो देश महासत्ताक बनतो. तसेच सुदृढ भारतासाठी सामुदायिक प्रयत्नांची आवशयकता आहे. आरोग्य हा प्रत्येकाचा अधिकार आहे आणि तो प्रत्येकाने मिळवला पाहिजे. त्याचबरोबर प्रत्येकाने कर्तव्यही पारडली पाहिजेत.शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. टी. ए. चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. मान्यवारांचा परिचय व सूत्रसंचालन प्रा. ए. ओ. निंबार्गीकर यांनी केले तर आभार प्रा. बी. ए. बचूटे यांनी मानले.

# वागदरी ग्राम पंचायतीच्या भोंगळ कारभाराच्या निषेधार्थ उपोषण आंदोलन

वागदरी/एस.के.गायकवाड : एकीकडे तुळजापूर तालुक्यातील वागदरी ग्राम पंचायतीची वाटचाल आदर्श ग्रामपंचायतीकडे होत असल्याची डांगोरी पिटविली जाते तर दुसरीकडे वागदरी ग्रामपंचायतीच्या भोंगळ कारभाराच्या निषेधार्थ उपोषण आंदोलन केले जाते त्यामुळे येथील ग्रामस्थामध्ये उलट सुलट चर्चा होताना दिसते आहे.

काही दिवसा पुर्वीच वागदरी येते झालेल्या काही विकास कामाचे लोकार्पण व काही विकास कामाचा शुभारंभ असा कार्यक्रम संपन्न झाला होता.त्यामध्ये हिंदु स्मशान भुमीचे सुशोभीकरणाचे व मुस्लीम स्मशानभुमी सिमेंट रस्त्याचे लोकार्पण तर गावातील एका अंतर्गत सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आदी सह अन्य विकास कामाचा समावेश होता.परंतु यापुर्वी जलजिवन योजने अंतर्गत घरागणीस नळ देण्याचे नियोजन करून गावातील मजबुत असलेले अंतर्गत सिमेंट रस्ते जेसीपीने उखरून गावात सर्वत्र पाईपलाईन टाकुन काम अर्धवट सोडलेआहे शिवाय या अर्धवट असलेल्या पाईपलाईनला पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन पाण्याच्या टाकीचे बांधकाम जोमाने सुरूवात करण्यात आले पण तेही काम अर्धवट आहे.त्यामुळे हर घर जल तर मिळालेच नाही उलट पाणी टंचाईच्या झळा गावाला जाणवत आहेत.शिवाय गावातील मजबुत सिमेंट रस्त्याची वाट लागली हे खरे आहे.गावातील साठे नगरात भुमिगत गटारीचे काम झाले असल्याचे समजते परंतू कोठेही साठे नगर म्हणून ग्रा.प.ने फलक लावला नाही किंवा गटार कामाचा तपशील दर्शीवणारा फलक लावला नाही.भिमनगर मधिल भुमिगत गटारीचे काम अर्धवट आहे.दलित वस्तीत सभागृह बांधकामासाठी निधी मंजुर झाला आहे पण काम सुरू करण्यासाठी मुहुर्थ सापडत नाही ज्या कामात पैसे मिळतात ते काम लगबगीने सुरू करतात जिथे पैसे मिळत नाहीत ते काम करण्यास संबधिताकडून टाळा टाळ केली जाते अशी चर्चा होत आहे.अनेक वर्षा पासून शासकीय कोरडगीरी नाक्याच्या जागेवरील अतिक्रमण काढा या मागणीकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. एकंदरीत या सर्व बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब वाघमारे यानी सरकारी कोरडगीरी नाक्याच्या जागेवरील अतिक्रमण तात्काळ हाटविण्यात यावे व ग्राम पंचायतीच्या भोगळ कारभाराच्या निषेधार्थ अमरण उपोषण आंदोलन सुरू केले होते.




# टेंभुच्या पाणी मंगळवेढ्याला मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू:आ. समाधान आवताडे



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांतून पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांना पहिल्यांदाच टेंभू योजनेच्या पाण्याची पाळी आमदार आवताडे यांनी मिळवून देऊन माण नदीकाठच्या शेतकऱ्यांना कृष्णामाईच्या पाण्याची ऐतिहासिक भेट घडवली होती सध्याही सदर योजनेतून पाणी पाळी सोडण्यात आले असून या भागातील जनतेला पाणी मिळवून देण्यासाठी आ. समाधान आवताडे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करुन निश्र्चितपणे टेंभूमधील पाणी मंगळवेढ्याच्या शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असल्याची माहिती त्यांनी गावभेट दौऱ्यात दिली.

मंगळवेढा तालुक्यातील पाणीप्रश्र्न हा केवळ राजकीय भांडवलाचा विषय न ठेवता याकडे संवेदनशील दृष्टीकोनातून पाहत आ समाधान आवताडे यांनी शनिवारी सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व टेंभू अधीक्षक गुणाले यांच्याशी संपर्क करून या भागातील पाण्याविना शेतकऱ्यांनी झालेली परिस्थिती कथन केली असता लवकरच या योजने अंतर्गत पाणी सोडण्याचे आ आवताडे यांना आश्र्वस्त करण्यात आले असल्याचे आवताडे यांनी सांगितले.

टेंभू योजनेतून पंढरपूर तालुक्यातील तावशी, तनाळी, तरटगाव, सिद्धेवाडी, चिचुंबे, शेटफळ तसेच मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी दहिवडी, महमदाबाद (शे), गुंजेगाव, घरनिकी, मारापूर, देगांव, शरदनगर, ढवळस, धर्मगांव, मुढवी या माण नदीकाठच्या गावांना हे पाणी मिळणार आहे.यावर्षी खरीप हंगामामध्ये अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने तालुक्यामध्ये दुष्काळी परिस्थितीचे ढग निर्माण झाले आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर शेतकरी व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीसाठी व पशुधन जगविण्यासाठी पाण्याअभावी खूप मोठ्या जल संकटांचा सामना करून पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे. वरील गावांना या योजनेतून कायमस्वरूपी पाणी मिळवून देण्याची तरतूद झाल्यास तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. मतदारसंघातील विविध विकास कामांना भरघोस निधीच्या रूपाने चालना देणारे आ आवताडे यांनी या योजनेच्या पाण्यासाठी आपली राजकीय ताकत पणाला लावली आहे.

# अचलेर मध्ये रंगणार नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा फड मानाची चांदीची गदा पटकावणार कोण ?



सोलापूर/महेश गायकवाडः अचलेरचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेनिमित्त यात्रा कमिटी दर वर्षीप्रमाणे या वर्षी ही मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा फड भरविला आहे, या जंगी कुस्त्या गुरूवार दिनांक ११ एप्रिल २४ रोजी येथील मल्लिकार्जून मंदीर परिसरातील कोरड्या तलावातील मातीत होणार आहेत, या जंगी कुस्त्या मध्ये नामवंत मल्ल दाखल होणार असल्यामुळे अचलेर येथील प्रगतशील आणि सदन ग्रामस्थानी विविध प्रकारचे बक्षिसे कुस्त्यामध्ये ठेवले आहेत, तर शेवट ची फायनल कुस्तीसाठी मानाचा चांदीची गदा हे बक्षिस असून येथील सामजिक कार्यकर्ते आणि प्रगतशील शेतकरी प्रदीप पुजारी यांचे वडील पांडुरंग भिमशा पुजारी यांच्या वतीने विजयी मल्लासाठी चांदीची गदा देण्यात येणार आहे. सेमी फायनल कुस्तीसाठी हिंद केसरी पैलवान मेजर सुभेदार कै.वसंतराव सोलंकर यांच्या स्मरणार्थ शंकरराव सोलंकर सर यांच्या तर्फे ११हजार १११ रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे.

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेनिमित्त भरविण्यात येणाऱ्या या जंगी कुस्त्याच्या फडात सहभागी होण्यासाठी राज्यांतील तसेच शेजारच्या कर्नाटक मधील आणि कोल्हापूर सातारा, सांगली, मिरज पंढपुर पुळज दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव मुस्ती, बोरामणी



अक्कलकोट तालुक्यातील देशमुख बोरगाव, बादोला, साफळे, मोट्याळ तसेच तुळजापूर तालुक्यातील बोळेगाव, गोंधळवाडी आणि आळंद तालुक्यातील आळंद येथील मल्ल तसेच गुलबर्गा बिदार बसकल्याण ,भालकी, उमरगा लातूर नांदेड आदि ठिकाणचे व अचलेर गावच्या पंचक्रोशीतील नामवंत मल्ल या कुस्तीच्या फडात उतरून नशीब अजमावत असतात. सोमवार दिनांक ८ एप्रिल २४ पासुन ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाची यात्रा सुरू होत असून ही यात्रा पाच दिवस चालणार आहे यात्रेत दररोज सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. श्री मल्लिकार्जुन देवाच्या यात्रेत श्री शंभु महादेवाची ऐतिहासीक कावड ही भिमनगर येथील कावडी चे मुख्य मानकरी कै. शंकर साधू गायकवाड यांच्या घरातून निघणार आहे , श्री शंभु महादेवची कावड हे श्री मल्लिकार्जून यात्रेतील मुख्य आकर्षण असणार आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या सर्व भक्तांसाठी खिरीचा प्रसाद वाटप केला जाणार आहे. दिनांक १२ एप्रिल २४ रोजी देव बोळवण्याच्या कार्यक्रमाने पाच दिवस चालेल्या या यात्रेची सांगता होणार आहे. या यात्रेत दररोज करमणुकीचे सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मंगळवारी पाडवा दिवशी रात्री ९ वाजता मनोधैर्य नाट्य मंडळ आयोजितत सामाजिक तिन अंकी नाटक रक्तात भिजली नाती हा प्रयोग सादर केला जाणार आहे. ही यात्रा मोठया उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरी करण्यासाठी यात्रा कमिटी प्रयत्नशील असून सर्वांनी यात्रेत मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन यात्रा उत्साहात आणि आनंदात व शांततेने साजरी करावी असे आवाहन श्री मल्लिकार्जुन देवस्थान यात्रा कमिटीने आमच्या प्रतिनीधीशी बोलताना व्यक्त केले आहे.

**गावांतील बेकायदेशीर अवैध धंदे व हातभट्टी दारू बंद करण्याची मागणी ग्रामस्थानी केली आहे. गावचे ग्राम दैवताची यात्रा असल्यामुळे ही यात्रा मोठया उत्साहात आणि आनंदात साजरी केली जाते, या यात्रेत सहभागी होण्यासाठी अचलेर पंचक्रोशीतील आणि बाहेर गावी कामा धंद्यासाठी गेलेले सर्व जण गावांत आलेले असतात, दूरवरचे भक्त मंडळीही यात्रेत सहभागी होण्यासाठी येतात, त्यामुळे गावची यात्रा उत्साही वातावरणात आणि शांततेत पार पाडण्यासाठी गावातील सर्व अवैध धंदे, हातभट्टी दारू चे अड्डे यात्रा काळात बंद करण्यात यावेत, अशी मागणी ग्रामस्थानी आमच्या प्रतिनीधीशी बोलताना केली आहे.**

# विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली विविध विकास कामांची पाहणी



पंढरपूर/प्रतिनिधीः पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या भाविकांना तसेच पंढरपूरात येणाऱ्या भाविकांना आवश्यक व दर्जेदार सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातर्गंत करण्यात आलेल्या विविध कामांची पाहणी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, विभागीय आयुक्त नगर प्रशासनाच्या सहआयुक्त पुनम मेहता, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकामचे अधिक्षक अभियंता संजय माळी, विभागीय आयुक्त कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी राजेश तितर, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, भिमा कालवा मंडळाचे अधिक्षक अभियंता ज्ञानदेव बागडे, गटविकास अधिकारी सुशील संसारे कार्यकारी अभियंता अमित निमकर, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, उपआयुक्त आशिष लोकरे ,उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त पुलकुंडवार म्हणाले, चंद्रभागा नदीचे पाविव्य टिकावे यासाठी वेळोवेळी चंद्रभागा नदी पात्राची स्वच्छता करण्यात यावी. भाविकांनी व नागरिकांनी निर्माल्य, कचरा नदीपात्रात टाकू नये यासाठी सूचना फलक लावावेत. तसेच लाऊड स्पिकरव्दारे सूचना देण्यात याव्यात. वारी व्यतिरिक्त दररोज पंढरपूरात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता आवश्यक ठिकाणी मोबाईल टॉयलेटची उपलब्धता ठेवावी. तसेच भाविकांसाठी प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सुविधाबाबतचे माहिती फलक लावावेत. आषाढी यात्रा कालावधीत पावसाची शक्यता असल्याने ६५ एकर येथील प्लॉटवर चिखल होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी अकलूज, वेळापूर भंडीशेगाव वाखरी येथील पालखी तळांची तसेच नाम संकीर्तन सभागृह ,पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, घाट, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर, गोपाळपूर येथील जलशुध्दीकरण प्रकल्पाची पाहणी केली.यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी प्रशासनाकडून कोणत्या सुविधा उपलब्ध केल्या जातात याची माहिती घेऊन अधिकच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत नियोजन करावे अशा सूचना दिल्या. वाखरी पालखी तळावरील मधोमध असणाऱ्या विद्युत वाहक तारा व खांब एका बाजूला सुरक्षित स्थळी लावण्यात यावेत. तसेच वारी कालावधीत भाविकांसाठी आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, सुरक्षा, विद्युत व्यवस्था, गर्दी व्यवस्थापन, दर्शन व्यवस्था आदीबाबतीची माहिती घेवून आवश्यक सूचना त्यांनी केल्या.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी वारकरी-भाविकांना प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली. मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समिती कडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली तर वारी कालावधतीत पोलीस प्रशासनाकडून भाविकांच्या सुरक्षेसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली.







# स्वेरीत शिक्षणाबरोबरच संस्कार देखील मिळतात

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक भीमराव जाधव

पंढरपूर/प्रतिनिधीः 'स्वेरीमध्ये मागील कांही वर्षांपासून आपण नियमितपणे पाहतो आहोत की, या ठिकाणी आदर्श विद्यार्थी घडवला जातोय. स्पर्धेच्या युगात विद्यार्थी हा समाजात ताठ मानेने जगण्यासाठी स्वेरीच्या डॉ. रोंगे सरांच्या माध्यमातून प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांकडून जे परिश्रम करून घेतले जात आहेत त्यांचे कौतुक करावेसे वाटते. स्वेरीमध्ये विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र ओळखणारे शिक्षक आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीमध्ये योग्य नियोजन दिसून येते.

स्वेरीतील शिक्षणातून विद्यार्थ्यावर योग्य संस्कार होत आहेत. आई-वडिल, गुरु आणि समाजातील थोर व्यक्तींचा आदर बाळगणारी पिढी स्वेरीमध्ये तयार होत आहे. शिक्षण तर सगळीकडेच मिळते पण स्वेरीतून शिक्षणाबरोबर संस्कार देखील मिळतात ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे.' असे प्रतिपादन निमगाव (म.) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक व पालक प्रतिनिधी भीमराव जाधव यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'एमबीए' अर्थात 'मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन' या विभागातर्फे 'पालक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक भीमराव जाधव हे मार्गदर्शन करत होते. तर दुसरे पालक प्रतिनिधी महादेव जेधे तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. सविता कोळसे पाटील ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर प्रास्तविकात प्रा. एम.एम.भोरे यांनी एमबीए विभागाची संपूर्ण माहिती देताना दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात घेण्यात येणारे विविध उपक्रम, महाविद्यालयाच्या सोई-सुविधा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व ग्रंथालयातील उपलब्ध संदर्भ पुस्तके व संबंधित बाबी सविस्तर पणे सांगितल्या. पालक प्रतिनिधी महादेव जेधे म्हणाले की, 'जीवन एक संघर्ष असून अशा संघर्षात स्वेरीमध्ये उचललेले प्रत्येक पाऊल हे स्तुत्य असते. त्यामुळे आमच्या मुलांमध्ये आत्मविश्र्वास वाढत आहे.' असे सांगून स्वेरीच्या 'पंढरपूर पॅटर्न' चा गौरव केला. विभागप्रमुख प्रा.करण पाटील हे पालकांशी संवाद साधताना म्हणाले की, 'पाल्यांच्या जडणघडणीमध्ये पालकांचा अत्यंत महत्वाचा वाटा असल्यामुळे आणि पाल्यांच्या प्रगतीसाठी पालकांसमवेत सुसंवाद व्हावा या हेतूने या 'पालक सभे'चे आयोजन केले आहे. यामध्ये विविध शैक्षणिक उपक्रम, ट्रिपल पीई, इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग स्कीम, नाईट स्टडी, महाविद्यालयाला मिळालेली विविध मानांकने, स्पर्धा परीक्षेची तयारी, प्लेसमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतलेली गरुड झेप, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्राणायम, आर्ट ऑफ लिव्हिंग सारखे प्रशिक्षण दिले जातात.' असे सांगून मोबाईलचा वापर गरजेपुरताच करावा व पाल्याच्या उज्वल भवितव्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांशी सातत्याने संवाद साधावा. यामुळे पाल्य हा सतर्क राहून विकासाच्या दिशेने झेपावतो'. प्रा. अमाद अहमद यांनी एमबीए च्या प्लेसमेंट विभागाची माहिती देवून गत वर्षापर्यंत प्लेसमेंट द्वारे विविध बँका आणि कंपन्यामध्ये उपलब्ध झालेल्या नोकरीच्या संधी बाबतची आकडेवारी तसेच प्लेसमेंट विभागाचे कार्य, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता, संवाद कौशल्ये, विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्र्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, संभाषण कौशल्य, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची माहिती पालकांना दिली. यावेळी महिला पालक प्रतिनिधी सौ. संध्या जोशी, सौ. सविता कोळसे पाटील, यांच्यासह काही पालकांनी आपले विचार मांडले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालक सभेत जवळपास १०० पालक तसेच, स्वेरीच्या 'एमबीए' विभागातील डॉ. एन.एस. मगर, डॉ. आर.आर.येळीकर, प्रा. पी.एस.मोरे, प्रा. के.पी. कौंडूभैरी, प्रा. एल.डी. जोशी यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन प्रा. एम.एम. भोरे यांनी केले तर प्रा. एस.डी. सरीक यांनी आभार मानले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणली विकासाची गंगा

## प्रचंड गर्दीत जेऊरमध्ये जाहीर सभा

अक्कलकोट/प्रतिनिधीः पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचे विकासपुरुष आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी विकासाची गंगा आणली आहे, असे प्रतिपादन भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी केले. लोकसभा निवडणूकीनिमित्त अक्कलकोट विधानसभेतील जेऊर या गावी झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपाचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, पंचायत समितीचे माजी सभापती विलास गव्हाणे, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, राम हुक्केरी, मल्लिकार्जुन बामणे, नंदकुमार सोनार, शरणप्पा चौलगी, दयानंद उंबरजे, विलास गव्हाणे, राम दुलंगे, खंडपण्णा वग्गे, ज्योती उन्नद, शिवप्पा देसाई आदी उपस्थित होते.

भाजपा आणि महायुतीचे आमदार राम सातपुते म्हणाले, यंदाची लोकसभा निवडणूक विकासपुरुष नरेंद्र मोदी विरुद्ध विकासाला विरोध करणाऱ्या काँग्रेसचे राहुल गांधी अशी आहे. मोदी सरकारकडून सोलापूर जिल्ह्यात ४० हजार कोटींची रस्त्यांची कामे सुरू आहेत. जल जीवन मिशनच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घरापर्यंत पाणी पोहोचवण्याचा प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. रेल्वेस्थानक, विमानतळाचा विकास करण्यात येत आहे. प्रभू श्रीरामाच्या मंदिराला विरोध करणाऱ्या काँग्रेसला धडा शिकवण्याची वेळ आली आहे. ही निवडणूक देशाच्या आणि धर्माच्या अस्तित्वाची निवडणूक आहे. गावोगावी भाजपाला मिळणारा उदंड प्रतिसाद पाहता यंदाच्या निवडणुकीत सोलापूरकर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासालाच मत देणार असल्याचे दिसून येत आहे, असेही आमदार राम सातपुते म्हणाले.



आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतामध्ये श्री अयोध्येतील श्रीराम मंदिर, उज्जैन येथील श्री महाकाल मंदिर, श्री काशीविश्र्वेश्र्वराचे मंदिर, रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण, विद्युतीकरण, पाण्यासाठीच्या योजना करण्यात आल्या आहेत. ६५ वर्षे कोणताही विकास न करणारी काँग्रेस १० वर्षांचा हिशोब मागत आहे. ६५ वर्षांमध्ये मोठे राष्ट्रीय महामार्ग का झाले नाहीत याचे उत्तर काँग्रेसने द्यावे असेही आमदार सचिन कल्याणशेट्टी याप्रसंगी म्हणाले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीनिमित्त शुक्रवारी दहिटणेवाडी, चपळगाववाडी, हालहल्ली (अ), कर्जाळ, कोन्हाळी, ब्यागेहल्ली, हंजगी, वसंतराव नाईक नगर, समर्थ नगर, दोड्याळ या गावांचा भाजपा व महायुतीचे उमेदवार राम सातपुते आणि अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा गाव भेट दौरा झाला. गावागावांमध्ये नागरिकांनी औक्षण करून हलगीच्या कडकडाटात फटाक्यांची आतिषबाजी करत भाजप व महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे जंगी स्वागत केले. सर्व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या विकासाला पाठिंबा देत भाजप व महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला. याप्रसंगी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.य

# प्रा.डॉ. वि.दा. कराड यांचा 'अरूचेलवर डॉ.एन. महालिंगम पुरस्कार' २०२४ पुरस्काराने सन्मान

पुणे/प्रतिनिधीः दूरदर्शी शिक्षण तज्ज्ञ, परोपकारासाठी वचनबद्धता असून देशाच्या सामाजिक विकासावर कायमस्वरूपी प्रभाव टाकणारे एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांचा शनिवारी तामिळनाडू येथे ' अरूचेलवर डॉ. एन. महालिंगम पुरस्कार' २०२४ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांना हा पुरस्कार सुप्रीम कोर्टाचे न्यायाधिश थिरू एमएम सुंदरेश यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तामिळनाडूच्या कोयंबटूर मधील कुमारगुरू संस्थेच्या वतिने कुमारगुरू फाउंडेशन डे आणि अरूचेलवर यांच्या जन्म शताब्दी निमित्त डॉ. कराड यांचा सत्कार करण्यात आला स्मृतिचिन्ह व मानपत्र हे पुरस्काराचे स्वरूप होते. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष बीके कृष्णराज वनवरायर, कुमारगुरू इन्स्टिट्यूटचे जॉइंट करस्पॉन्डन्ट शंकर वनवरायर व अन्य उपस्थित होते. पुरस्काराला उत्तर देतांना प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा.कराड म्हणाले,




हा पुरस्कार स्विकारातांना मला अत्यंत आनंद होत आहे. आम्ही संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम यांच्या तत्वज्ञानाचे पालन करून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीची स्थापना केली. जगातील सर्वात मोठ्या डोमची निर्मिती करून संपूर्ण मानव जातीला शांतीचा संदेश देण्याचे कार्य सुरू आहे. स्वामी विवेकानंद यांनी सांगितल्यानुसार संपूर्ण भारत माताच संपूर्ण जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखविणार आहे. विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालून येथे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. तसेच मूल्यवर्धीत शिक्षण व विद्यार्थ्यांचे चारित्र्य निर्मितीवर अधिक भर दिला जातो. या वेळी न्यायाधिश थिरू एमएम सुंदरेश आणि बीके कृष्णराज वनवरायर यांनी आपले विचार मांडले. कुमारगुरू संस्थेच्या लिबरल ऑर्टस अँड सायन्सच्या प्रिन्सिपल डॉ. व्हिजला केनडी यांनी आभार मानले.